MHST160007662015

## नि.दि.मु.क्र. १३५/२०१५ मधील नि. ५१अ व ५२ वरील एकत्रीत आदेश

(तुकाराम यादव व इतर वि. गुणाबाई यादव व इतर)

वादींतर्फे सदरचे अर्ज वादी क्र. १ तुकाराम दिनकर यादव हा मयत झाल्याने त्याचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी व त्याकरीता झालेला विलंब माफ करुन, तसेच अबेटमेंट सेट असाईड करुन तशी दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेले आहेत.

२. वादींचे असे म्हणणे आहे की, सदरचा दावा वादींनी प्रतिवादींकडुन वाटप होवुन मिळणेकरीता केला आहे. प्रकरण प्रलंबित असताना वादी क्र. १ हा दि. १६.०३.२०१६ रोजी मयत झाला. वादीच्या वारसांना दाव्याची माहीती नसल्याने वादी यांना वादी क्र. १ चे वारस मुदतीत रेकॉर्डवर घेता आले नाही. दाव्याचे कामकाज गुणदोषावर होण्याकरीता वादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे असून ते घेण्यास झालेला विलंब माफ करण्यात येवून त्याचेविरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करण्यात येवुन त्याचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी मिळावी व तशी दुरुस्ती करणेसाठी वादींना परवानगी दयावी, अशी विनंती वादीने केली आहे.

३. सदर अर्जांवर प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादींनी सदर अर्जांवर म्हणणे दाखल करुन वादींची कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादींचे म्हणणे असे आहे की, वादीतर्फे मयत वारस रेकॉर्डवर घेणेकामी यापुर्वी अर्ज केलेला होता. सदर अर्ज प्रलंबित असताना पुन्हा वारस रेकॉर्डवर घेणेकामी सदरचा अर्ज कायदेशीर नाही.

४. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि. १६.०३.२०१६ रोजी वादी क्र. १ मयत झाला आहे. दि. ०६.०८.२०१८ रोजी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यात आला आहे. वादी क्र. १ मयत झाल्यापासुन ९० दिवसांच्या आत वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. अर्ज दाखल करण्यास जवळपास दोन वर्षे उशीर झालेला आहे. वादींनी प्रतिवादींकडुन वाटप होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. त्यामुळे वादींना वादी क्र. १ च्या वारसांविरुध्द दावा चालविण्याचा अधिकार आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता, कोविड – १९ चा विचार करता, तसेच दाव्याचा निकाल गुणदोषावर होण्याकरीता मयताचे वारसांना अभिलेखावर

घेणे गरजेचे आहे. तसेच प्रतिवादींविरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करणे गरजेचे आहे. याकरीता झालेला विलंब हा वादींवर खर्च लादुन माफ करणे योग्य होईल. करीता, वादींनी मागणी केल्याप्रमाणे अर्ज मंजुर करणे योग्य होईल. सबब खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. अर्ज नि. ५१अ व ५२ हे वादींवर खर्च र. रु. ५००/- (र. रु. पाचशे फक्त) लादुन मंजूर करण्यात येतात.

२. मयत वादी क्र. १ चे वारस अभिलेखावर घेण्याकरीता झालेला विलंब खर्चाची रक्कम भरल्यानंतर माफ करण्यात येतो तसेच सदर वादीविरुध्द झालेला अबेटमेंटचा हुकूम रद्द करण्यात येतो.

३. वादींनी मयत वादी क्र. १ चे वारस सदर आदेश झाल्यापासुन १४ दिवसांचे आत अभिलेखावर घेवुन अर्जात नमूद केलेली दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत मुदतीत दाखल करावी.

ठिकाण – वाई.
दिनांक – २८.०९.२०२२.

(सी. व्ही. शिरसाट)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर वाई.